साप्ताहिक

‘‘एकच ध्येय... एकच आवाज’’

PRGI No. MAHMAR / 25 / A5304
पोस्ट परवाना नं. : DHL/642/2026-28

# प्रजा न्याय

संपादक – संजय अण्णा कुसळकर

Mob. : 9422798093 / 9028136953
Email - kusalkars@gmail.com
prajanyay@gmail.com

वर्ष-१ले | अंक ३७ वा | सोमवार, दि. २८/०९/२०२६ ते दि. ०४/१०/२०२६ | पाने ४ | किंमत ३ रुपये

## जिल्ह्याच्या दुष्काळी प्रश्नावर कायमस्वरूपी व शाश्वत उपाययोजनांची गरज-पालकमंत्री जयकुमार रावल

### फागणे-मुकटी परिसरातील नुकसानग्रस्त पिकांची बांधावर जाऊन पाहणी; शेतकऱ्यांशी थेट संवाद





धुळे (जिमाका) – पावसाने तब्बल ४० ते ५० दिवस दडी मारल्याने शेतकऱ्यांच्या डोळ्यांदेखत उभी पिके करपली आहेत. अनेक शेतकऱ्यांच्या हातातोंडाशी आलेला घास हिरावला गेला आहे. या संकटाच्या काळात राज्य शासन शेतकऱ्यांना वाऱ्यावर सोडणार नाही. नुकसानीचे पंचनामे वेगाने पूर्ण करून आवश्यक मदत दिवाळीपूर्वी शेतकऱ्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी शासन कटिबद्ध आहे. शेतकऱ्यांची दिवाळी अंधारात जाऊ देणार नाही, अशी ग्वाही राज्याचे जलसंपदा व आपत्ती व्यवस्थापन मंत्री गिरीश महाजन यांनी दिली. जलसंपदा व आपत्ती व्यवस्थापन मंत्री श्री. महाजन आणि राज्याचे पणन व राजशिष्टाचार मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री जयकुमार रावल यांनी आज धुळे तालुक्यातील फागणे व मुकटी परिसरात थेट शेतांच्या बांधावर जाऊन दुष्काळामुळे नुकसान झालेल्या कपाशी, मका, सोयाबीन व अन्य पिकांची प्रत्यक्ष पाहणी केली. यावेळी त्यांनी शेतकऱ्यांशी संवाद साधून पिकांचे झालेले नुकसान, उत्पादनावर झालेला परिणाम तसेच पुढील काळातील पाणी व चाऱ्याच्या संभाव्य समस्यांची माहिती जाणून घेतली. यावेळी आमदार राघवेंद्र भदाणे, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी बाबासाहेब बेलदार, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी सुरज जगताप, गटविकास अधिकारी गणेश चौधरी, तहसीलदार अरुण शेवाळे, अपर तहसीलदार वैशाली हिंगे, रामकृष्ण खलाणे, मुंबई बाजार समितीचे सदस्य रावसाहेब गिरासे, जिल्हा परिषदेचे माजी सदस्य पंकज कदम यांच्यासह संबंधित अधिकारी, पदाधिकारी व शेतकरी उपस्थित होते.

शेतातील नुकसान प्रत्यक्ष पाहिल्यानंतर मंत्री श्री. महाजन म्हणाले, उत्तर महाराष्ट्रासह मराठवाडा आणि विदर्भातील अनेक भागांत पावसाच्या दीर्घ खंडामुळे खरीप पिकांची स्थिती अत्यंत गंभीर झाली आहे. साडेतीन ते चार महिन्यांपूर्वी मोठ्या आशेने लावलेली कपाशी, सोयाबीन आणि मक्याची पिके पाण्याअभावी उद्ध्वस्त झाली आहेत. अनेक ठिकाणी सोयाबीनच्या शेंगांमध्ये दाणे भरलेले नाहीत, तर मक्याची स्थिती इतकी बिकट झाली आहे की त्याचा चाराही जनावरांना खाण्यायोग्य राहिलेला नाही. वर्षभराच्या उत्पन्नाची आशा असलेली पिके डोळ्यांदेखत करपल्याने शेतकऱ्यांसमोर मोठे आर्थिक संकट उभे राहिले आहे. शेतकऱ्याच्या शेतातील हे नुकसान केवळ पिकांचे नुकसान नाही. त्यामागे त्याचे वर्षभराचे कष्ट, कुटुंबाच्या अपेक्षा आणि भविष्यातील स्वप्ने जोडलेली आहेत. या संकटातून शेतकऱ्याला बाहेर काढण्यासाठी शासन पूर्ण ताकदीने त्याच्या पाठीशी उभे राहील, असे मंत्री श्री. महाजन यांनी सांगितले.

परिस्थितीची तीव्रता लक्षात घेऊन शासनाने दुष्काळी परिस्थितीबाबत निर्णय घेतला असून संबंधित यंत्रणांना प्रत्यक्ष पाहणी करून नुकसानीचे पंचनामे तातडीने पूर्ण करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. धुळे व जळगावसारख्या जिल्ह्यांतील गंभीर परिस्थितीचा विचार करून शेतकऱ्यांना जास्तीत जास्त दिलासा देण्यासाठी शासन प्रयत्नशील आहे. मागील नैसर्गिक आपत्तींच्या काळात ज्या पद्धतीने निकषांच्या पलीकडे जाऊन शेतकऱ्यांना भरीव मदत करण्यात आली, त्याच संवेदनशीलतेने याही संकटात मदत केली जाईल, असे श्री. महाजन यांनी स्पष्ट केले. पुढील सात ते आठ महिन्यांचा काळ अधिक आव्हानात्मक राहणार असल्याचे नमूद करून श्री. महाजन म्हणाले, पिण्याच्या पाण्याचा आणि जनावरांच्या चाऱ्याचा प्रश्न गंभीर होण्याची शक्यता आहे. त्यामुळे धरणे, तलाव आणि उपलब्ध जलस्रोतांमधील पाण्याचे काटेकोर नियोजन करून पिण्याच्या पाण्यास सर्वोच्च प्राधान्य द्यावे लागेल. संभाव्य चारा टंचाई लक्षात घेऊन चाऱ्याची उपलब्धता तसेच आवश्यकतेनुसार चारा छावण्यांचे नियोजन आतापासूनच करावे लागेल. सर्व संबंधित यंत्रणांनी पूर्णपणे सतर्क राहून परिस्थितीवर बारकाईने लक्ष ठेवावे, अशा सूचनाही त्यांनी दिल्या.

यावेळी शेतकऱ्यांशी संवाद साधताना पालकमंत्री जयकुमार रावल म्हणाले, धुळे जिल्हा हा सातत्याने दुष्काळी परिस्थितीचा सामना करणारा जिल्हा म्हणून ओळखला जातो. त्यामुळे प्रत्येक वेळी पाणीटंचाई आणि दुष्काळ निर्माण झाल्यानंतर तात्पुरत्या उपाययोजना करण्याऐवजी या समस्येवर कायमस्वरूपी आणि शाश्वत तोडगा काढण्याची गरज आहे. पश्चिम महाराष्ट्राच्या धर्तीवर धुळे जिल्ह्यातही व्यापक जलसंधारणाची कामे मिशन मोडवर हाती घेणे आवश्यक आहे. लहान-मोठे बंधारे, जलसाठ्यांचे बळकटीकरण, नाला खोलीकरण व रुंदीकरण, पाणलोट क्षेत्र विकास, उपलब्ध पाण्याचा कार्यक्षम वापर आणि भूजल पुनर्भरण यांसारख्या कामांना व्यापक स्वरूप देण्याची गरज आहे. यासाठी शासनस्तरावर आवश्यक पाठपुरावा करून धुळे जिल्ह्याच्या दुष्काळी समस्येवर दीर्घकालीन व शाश्वत उपाययोजना करण्यासाठी आपण प्रयत्नशील असल्याचे पालकमंत्री श्री. रावल यांनी सांगितले.

दुष्काळ पडल्यानंतर उपाययोजना करणे एवढ्यावर न थांबता, भविष्यात दुष्काळाची तीव्रता कमी कशी करता येईल, प्रत्येक थेंब पाणी जमिनीत कसे मुरेल आणि शेतकऱ्याला वर्षभरासाठी पाण्याची शाश्वत उपलब्धता कशी निर्माण करता येईल, याचा विचार करणे आवश्यक आहे. धुळे जिल्ह्यासाठी व्यापक जलसंधारणाचा दीर्घकालीन आराखडा तयार करण्याची गरज आहे, असे श्री. रावल यांनी नमूद केले. दुष्काळी परिस्थितीत पाणी, चारा, शेती आणि रोजगार या चारही बाबींचे पुढील काळासाठी सूक्ष्म नियोजन प्रशासनाने करावे. शासनाने जाहीर केलेल्या सर्व सवलती व मदत प्रत्येक पात्र शेतकऱ्यापर्यंत वेळेत पोहोचली पाहिजे. पंचनाम्यांपासून प्रत्यक्ष मदत मिळेपर्यंत प्रशासनाने शेतकऱ्यांसोबत राहून संवेदनशीलतेने काम करावे, अशा सूचनाही पालकमंत्री श्री. रावल यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या. पाहणीदरम्यान मंत्र्यांनी करपलेली कपाशी, दाणा न भरलेल्या सोयाबीनच्या शेंगा आणि वाळून गेलेल्या मक्याची प्रत्यक्ष पाहणी केली. शेतकऱ्यांनी पीक उभे करण्यासाठी केलेला खर्च, कर्जाचा वाढलेला भार आणि निर्माण झालेली आर्थिक चिंता मंत्र्यांसमोर मांडली. मंत्र्यांनी त्यांचे म्हणणे संवेदनशीलपणे ऐकून घेत प्रशासनाला नुकसानीची वस्तुनिष्ठ आणि अचूक नोंद घेण्याच्या सूचना दिल्या. आज संकट मोठे आहे; मात्र या संकटात शेतकरी एकटा नाही. पंचनाम्यापासून मदतीपर्यंत आणि तातडीच्या दिलाशापासून भविष्यातील शाश्वत उपाययोजनांपर्यंत शासन शेतकऱ्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे आहे, असा विश्वास यावेळी मंत्री गिरीश महाजन व पालकमंत्री जयकुमार रावल यांच्याकडून व्यक्त करण्यात आला.

## सेवा संकल्प अभियानातून जात वैधता प्रकरणांना गती ; त्रुटीपूर्ततेसाठी विशेष मोहीम

धुळे (जिमाका) – राज्य सेवा संकल्प अभियानांतर्गत जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समिती, धुळे कार्यालयामार्फत प्रलंबित जात दावा प्रकरणांतील त्रुटींची पूर्तता करून ती निकाली काढण्यासाठी १७ सप्टेंबर ते १७ ऑक्टोबर, २०२६ या कालावधीत विशेष मोहीम राबविण्यात येत आहे, अशी माहिती जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समितीच्या उपायुक्त तथा सदस्य अमिनी शेख यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे दिली आहे. इयत्ता ११ वी व १२ वी विज्ञान शाखेत शिक्षण घेणारे तसेच सीईटीद्वारे शैक्षणिक वर्ष २०२६-२७ मध्ये व्यावसायिक अभ्यासक्रमांना प्रवेश घेतलेले मागासवर्गीय विद्यार्थी, ज्यांनी जात वैधता प्रमाणपत्रासाठी अर्ज सादर केले आहेत; मात्र आवश्यक कागदपत्रे किंवा त्रुटीपूर्ततेअभावी त्यांची प्रकरणे समितीकडे प्रलंबित आहेत, अशा विद्यार्थ्यांसाठी ही विशेष सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. या मोहिमेंतर्गत संबंधित विद्यार्थ्यांनी १७ सप्टेंबर ते १७ ऑक्टोबर, २०२६ या कालावधीत दर मंगळवारी व बुधवारी जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समिती, धुळे कार्यालयात प्रत्यक्ष उपस्थित राहून आवश्यक कागदपत्रांच्या स्पष्ट व साक्षांकित प्रतींसह त्रुटींची पूर्तता करावी. यामुळे प्रलंबित जात दावा प्रकरणांवरील कार्यवाही अधिक वेगाने पूर्ण करणे शक्य होणार आहे.

ज्या विद्यार्थ्यांनी जात वैधता प्रमाणपत्रासाठी ऑनलाइन अर्ज सादर केला आहे; मात्र त्याची हार्डकॉपी अद्याप समिती कार्यालयात जमा केलेली नाही, त्यांनी ती तातडीने समितीच्या नागरी सुविधा केंद्रात जमा करावी. तसेच अर्ज भरताना तयार केलेले लॉगिन युजरनेम, पासवर्ड, ई-मेल आयडी आणि अर्जात नमूद केलेला मोबाईल क्रमांक सुरक्षित ठेवावा. त्यामुळे समितीकडून पाठविण्यात येणारे निर्णय, सूचना आणि त्रुटींबाबतचे संदेश वेळेत प्राप्त होण्यास मदत होईल. जात दावा प्रकरणांच्या कामकाजासाठी कोणत्याही एजंट, दलाल अथवा मध्यस्थांच्या आर्थिक आमिषाला बळी पडू नये. प्रस्तावासंदर्भात कोणतीही अडचण असल्यास अर्जदारांनी थेट जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समिती, धुळे कार्यालयाशी संपर्क साधावा, असे आवाहन उपायुक्त तथा सदस्य अमिनी शेख यांनी केले आहे.

# दुष्काळी परिस्थितीला संवेदनशीलपणे सामोरे जा; प्रत्येक यंत्रणेने कृती आराखडा तयार करावा–पालकमंत्री जयकुमार रावल

## पाणी, रोजगार, चारा व शेतीसाठी पुढील१० ते १२ महिन्यांचे नियोजन करण्याचे निर्देश




धुळे (जिमाका) – धुळे जिल्ह्यातील चारही तालुक्यांचा दुष्काळाच्या 'ट्रिगर–१ (प्रथम कळ)'मध्ये समावेश झाल्याच्या पार्श्वभूमीवर जिल्ह्यातील दुष्काळी परिस्थितीला संवेदनशीलपणे आणि नियोजनबद्ध पद्धतीने सामोरे जावे. पिण्याचे पाणी, रोजगार, जलसंधारण, शेती, अन्नधान्य, पशुधनासाठी चारा आणि वीजपुरवठा या बाबींना सर्वोच्च प्राधान्य देत प्रत्येक संबंधित यंत्रणेने तातडीने कृती आराखडा तयार करून त्याची प्रभावी अंमलबजावणी करावी, असे निर्देश राज्याचे पणन व राजशिष्टाचार मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री जयकुमार रावल यांनी आज संबंधित अधिकाऱ्यांना दिले. राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ट्रीगर १ मध्ये जिल्ह्यातील चारही तालुक्यांचा सामावेश दुष्काळग्रस्तमध्ये केल्याच्या नुषंगाने पालकमंत्री श्री. रावल यांनी रविवारी जिल्ह्यातील प्रमुख प्रशासकीय अधिकारी व विविध विभागप्रमुखांची तातडीची बैठक घेऊन विभागनिहाय तयारीचा आढावा घेतला. या बैठकीस आमदार राघवेंद्र भदाणे, जिल्हाधिकारी भाग्यश्री विसपुते दूरदृश्य प्रणालीद्वारे, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी बाबासाहेब बेलदार, अतिरिक्त जिल्हाधिकारी संदीप पाटील, निवासी उपजिल्हाधिकारी शरद पवार तसेच विविध शासकीय यंत्रणांचे प्रमुख अधिकारी उपस्थित होते. पालकमंत्री श्री. रावल यांनी अधिकाऱ्यांना निर्देश दिले की, दुष्काळग्रस्त भागातील आवश्यक पंचनामे व अनुषंगिक कार्यवाही कोणत्याही परिस्थितीत प्रलंबित ठेवू नये. शासनाकडून मिळणारी मदत पात्र शेतकऱ्यांपर्यंत लवकरात लवकर पोहोचेल, यासाठी संबंधित यंत्रणांनी आवश्यक माहिती संकलित करून प्रस्ताव वेळेत सादर करावेत. सोमवारपासून सर्व संबंधित विभागांनी स्वतंत्र आढावा बैठका घेऊन प्रत्यक्ष अंमलबजावणीस सुरुवात करावी. 'ट्रिगर–१' लागू झालेल्या भागांसाठी शासनाने जाहीर केलेल्या दुष्काळी सवलतींचा पात्र लाभार्थ्यांना प्रत्यक्ष लाभ मिळेल, यासाठी महसूल, कृषी, सहकार, ऊर्जा, शिक्षण, रोजगार हमी आणि संबंधित विभागांनी परस्पर समन्वयाने काम करावे. जमीन महसुलात सूट, पीक कर्जाचे पुनर्गठन, शेतीशी संबंधित कर्जाच्या वसुलीस स्थगिती, कृषी पंपांच्या चालू वीजबिलात सूट, शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या परीक्षा शुल्कात माफी. रोजगार हमी योजनेअंतर्गत अधिकाधिक कामे उपलब्ध करून देणे, आवश्यकतेनुसार पिण्याच्या पाण्यासाठी टँकरची व्यवस्था तसेच टंचाईग्रस्त भागातील कृषी पंपांची वीजजोडणी खंडित न करणे या सवलतींच्या अंमलबजावणीत कोणतीही दिरंगाई होता कामा नये, असे त्यांनी स्पष्ट केले. २ ऑक्टोबर रोजी होणाऱ्या ग्रामसभांमध्ये प्रत्येक गावासाठी पुढील १० महिन्यांचा रोजगार आराखडा तयार करावा. गावातील उपलब्ध कामे, मजुरांची संभाव्य संख्या आणि स्थानिक गरजा लक्षात घेऊन कामांचे नियोजन करावे. मंजूर कामांना तातडीने सुरुवात करून ग्रामीण भागातील नागरिकांना शक्यतो त्यांच्या गावातच रोजगार उपलब्ध करून द्यावा. दुष्काळी परिस्थितीत रोजगारासाठी स्थलांतर होऊ नये, यासाठी ग्रामपंचायत, पंचायत समिती आणि संबंधित विभागांनी समन्वयाने गावनिहाय कामांची यादी तयार करावी,

अशा सूचनाही पालकमंत्री श्री. रावल यांनी दिल्या. कृषी आणि ग्रामविकास विभागांनी उपलब्ध योजनांचे अभिसरण करून दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना जास्तीत जास्त मदत उपलब्ध करून द्यावी. फलोत्पादन क्षेत्रात कोणती कामे हाती घेता येतील, याचा तातडीने अभ्यास करून प्रस्ताव तयार करावेत. उभी पिके वाचविणे, उपलब्ध पाण्याचा कार्यक्षम वापर करणे आणि शेतकऱ्यांना वेळेत मदत उपलब्ध करून देण्यासाठी गावनिहाय परिस्थितीचा आढावा घेण्याच्या सूचना त्यांनी दिल्या. जलसंधारण विभागाने जिल्ह्यातील उपलब्ध जलस्रोतांचा आढावा घेऊन पुढील १० ते १२ महिन्यांसाठी पिण्याचे पाणी, शेती आणि पशुधनाची गरज लक्षात घेऊन सूक्ष्म नियोजन करावे. पाणी अडविणे व जिरविणे, लहान बंधारे व जलस्रोतांची दुरुस्ती, पाणीगळती रोखणे आणि उपलब्ध पाण्याचा काटकसरीने वापर करण्यास प्राधान्य द्यावे. पाण्याचा अपव्यय होणार नाही, याची संबंधित यंत्रणांनी दक्षता घ्यावी, असे त्यांनी सांगितले. पशुसंवर्धन विभागाने जिल्ह्यातील पशुधनाची संख्या, उपलब्ध चारा आणि संभाव्य मागणी यांचा तातडीने आढावा घेऊन चारा व पाण्याचे आगाऊ नियोजन करावे. जनावरांना चारा किंवा पाण्याची कमतरता भासणार नाही, यासाठी स्वतंत्र कृती आराखडा तयार ठेवण्याच्या सूचनाही त्यांनी दिल्या. ऊर्जा विभागाने सकाळी ८ ते सायंकाळी ६ या वेळेत शक्य तितका सुरळीत वीजपुरवठा उपलब्ध करून देण्यासाठी आवश्यक नियोजन करावे. ज्या शेतकऱ्यांच्या विहिरी किंवा अन्य जलस्रोतांमध्ये पाणी उपलब्ध आहे, त्यांना त्या पाण्याचा उपयोग करून उभी पिके वाचविता यावीत, हा यामागील उद्देश असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. वीजपुरवठ्याशी संबंधित तक्रारींचाही तातडीने निपटारा करावा, अशा सूचना त्यांनी दिल्या. अन्न व नागरी पुरवठा विभागाने दुष्काळग्रस्त भागातील गरजू कुटुंबांना अन्नधान्याचा पुरवठा नियमित आणि वेळेत होईल, याची दक्षता घ्यावी. कोणताही पात्र नागरिक अन्नधान्यापासून वंचित राहणार नाही, यासाठी स्वस्त धान्य दुकानांमार्फत होणाऱ्या वितरणावर सातत्याने लक्ष ठेवावे, असेही पालकमंत्री श्री. रावल यांनी सांगितले. शेतपिकांच्या नुकसानीचे पंचनामे निर्धारित कार्यपद्धतीनुसार तातडीने पूर्ण करावेत. महसूल व कृषी यंत्रणांनी समन्वयाने काम करून कोणतेही पात्र प्रकरण प्रलंबित राहणार नाही, याची दक्षता घ्यावी. शासनाकडून जाहीर होणाऱ्या मदतीचा लाभ शेतकऱ्यांना विनाविलंब मिळण्यासाठी आवश्यक पूर्वतयारी पूर्ण ठेवावी, असे त्यांनी निर्देशित केले. पालकमंत्री श्री. रावल म्हणाले की, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी धुळे जिल्ह्यातील दुष्काळी परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेऊन वेळेत निर्णय घेतल्यामुळे जिल्ह्यातील शेतकरी, शेतमजूर आणि सर्वसामान्य नागरिकांना मोठा दिलासा मिळणार आहे. परिस्थितीची तीव्रता ओळखून शासनाने घेतलेल्या या निर्णयाबद्दल त्यांनी धुळे जिल्ह्यातील जनतेच्या वतीने मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांचे आभार व्यक्त केले.

दुष्काळ ही केवळ कृषी विभागाची जबाबदारी नसून संपूर्ण जिल्हा प्रशासनाने समन्वयाने हाताळण्याची परिस्थिती आहे. त्यामुळे प्रत्येक विभागाने आपली जबाबदारी निश्चित करून कालबद्ध पद्धतीने काम करावे. नागरिकांना पाणी, रोजगार व अन्नधान्य, शेतकऱ्यांना आवश्यक मदत आणि पशुधनाला चारा व पाणी उपलब्ध करून देण्यासाठी सर्व यंत्रणांनी संवेदनशीलपणे काम करावे, असे निर्देश त्यांनी दिले. दुष्काळी परिस्थितीत जिल्ह्यातील एकही शेतकरी, शेतमजूर, नागरिक किंवा पशुपालक प्रशासनाच्या मदतीपासून वंचित राहता कामा नये. शासनाच्या सर्व सवलती आणि उपलब्ध योजनांचा लाभ पात्र लाभार्थ्यांपर्यंत वेळेत पोहोचविणे ही प्रत्येक अधिकाऱ्याची जबाबदारी आहे. सर्व विभागांनी परस्पर समन्वयाने आणि संवेदनशीलतेने काम करावे, असे पालकमंत्री श्री. जयकुमार रावल यांनी स्पष्ट केले.

# मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्तीची उर्वरित रक्कम महाविद्यालयात जमा करा–सहाय्यक आयुक्त देविदास नांदगांवकर यांचे आवाहन

धुळे (जिमाका) – भारत सरकार मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्ती योजनेंतर्गत अनुसूचित जाती प्रवर्गातील विद्यार्थ्यांच्या बँक खात्यात केंद्र शासनाच्या हिश्श्याची जमा झालेली ६० टक्के रक्कम, त्यातून निर्वाह भत्याची रक्कम वजा करून उर्वरित रक्कम संबंधित महाविद्यालयात जमा करणे आवश्यक आहे. ज्या विद्यार्थ्यांनी अद्याप ही रक्कम महाविद्यालयात जमा केलेली नाही, त्यांनी ती तात्काळ जमा करावी, असे आवाहन समाज कल्याण विभागाचे सहाय्यक आयुक्त देविदास नांदगांवकर यांनी प्रसिद्धीपत्रकान्वये केले आहे. श्री. नांदगांवकर यांनी प्रसिद्धीपत्रकात म्हटले आहे की, धुळे जिल्ह्यातील विविध शैक्षणिक संस्थांमध्ये शैक्षणिक वर्ष २०२१–२२ ते २०२५–२६ या कालावधीत प्रवेश घेतलेल्या अनुसूचित जाती प्रवर्गातील विद्यार्थी व त्यांच्या पालकांनी याची नोंद घ्यावी. सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या भारत सरकार मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्ती योजनेंतर्गत केंद्र शासनाचा ६० टक्के हिस्सा थेट लाभ हस्तांतरण (डीबीटी) प्रणालीद्वारे संबंधित विद्यार्थ्यांच्या बँक खात्यात जमा करण्यात येतो. ही रक्कम विद्यार्थ्यांच्या खात्यात जमा झाल्यानंतर पुढील सात दिवसांच्या आत त्यामधून विद्यार्थ्यांचा निर्वाह भत्ता वजा करून उर्वरित रक्कम संबंधित महाविद्यालयात जमा करणे बंधनकारक आहे. मात्र, अद्याप काही विद्यार्थ्यांनी त्यांच्या खात्यात जमा झालेल्या केंद्र शासनाच्या ६० टक्के हिश्श्यातील निर्वाह भत्ता वजा जाता उर्वरित रक्कम महाविद्यालयाकडे जमा केलेली नसल्याचे सहाय्यक आयुक्त श्री. नांदगांवकर यांनी स्पष्ट केले आहे. यासंदर्भात मुंबई उच्च न्यायालयात दाखल विविध याचिकांच्या अनुषंगाने आयुक्त, समाज कल्याण, पुणे यांनी आवश्यक निर्देश दिले आहेत. त्यानुसार ज्या विद्यार्थ्यांच्या बँक खात्यात केंद्र शासनाच्या हिश्श्याची ६० टक्के रक्कम जमा झाली आहे; मात्र त्यांनी निर्वाह भत्ता वजा करून उर्वरित रक्कम संबंधित महाविद्यालयात जमा केलेली नाही, अशा विद्यार्थ्यांनी ही रक्कम तात्काळ महाविद्यालयात जमा करावी, असे श्री. नांदगांवकर यांनी कळविले आहे. संबंधित विद्यार्थ्यांनी विहित रक्कम महाविद्यालयात जमा न केल्यास त्यासंदर्भात संबंधित बँकेकडून करण्यात येणाऱ्या कारवाईस विद्यार्थी व त्यांचे पालक स्वतः जबाबदार राहतील. त्यामुळे संबंधित विद्यार्थी व पालकांनी याची गांभीर्याने नोंद घेऊन आवश्यक कार्यवाही तातडीने पूर्ण करावी, असे आवाहन समाज कल्याण विभागाचे सहाय्यक आयुक्त देविदास नांदगांवकर यांनी प्रसिद्धीपत्रकान्वये केले आहे.

# दुष्काळ जाहीर झाला; आता प्रत्येक बाधित शेतकऱ्याच्या अश्रूंना दिलासा देण्याची वेळ–विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर

धुळे (जिमाका) – शेतात उभे असलेले करपलेले पीक म्हणजे केवळ पिकाचे नुकसान नसते; त्यामागे शेतकऱ्याचे वर्षभराचे कष्ट, कुटुंबाची स्वप्ने, मुलांच्या शिक्षणाच्या अपेक्षा आणि उद्याच्या जगण्याची चिंता दडलेली असते. त्यामुळे दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांच्या नुकसानीचे वास्तववदर्शी पंचनामे करून त्यांना योग्य नुकसानभरपाई व आवश्यक सुविधा मिळवून देण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न केले जातील. या प्रश्नांवर विधिमंडळातही संवेदनशीलतेने सखोल चर्चा घडवून आणण्याची आपली जबाबदारी पूर्ण केली जाईल, अशी ग्वाही महाराष्ट्र विधानसभेचे अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी आज धुळे तालुक्यातील दुष्काळग्रस्त भागाची पाहणी करताना शेतकऱ्यांशी संवाद साधताना दिली. दुष्काळ घोषित झाल्यानंतर आता शासनाच्या मदतीचा हात प्रत्यक्षात प्रत्येक पात्र शेतकऱ्याच्या बांधापर्यंत पोहोचला पाहिजे, या भूमिकेतून विधानसभा अध्यक्ष श्री. नार्वेकर यांनी गोंदूर, निमडाळेसह धुळे तालुक्यातील विविध पंचक्रोशीतील गावांमध्ये थेट शेतात जाऊन कापूस, मका आणि अन्य पिकांची पाहणी केली. उन्हाने आणि पाण्याअभावी कोमेजलेल्या पिकांच्या रांगा, मातीतच अडकलेली शेतकऱ्याची गुंतवणूक आणि डोळ्यांसमोर कमी होत चाललेले अपेक्षित उत्पन्न पाहताना त्यांनी शेतकऱ्यांशी अत्यंत आत्मीयतेने संवाद साधला.

काही शेतकऱ्यांनी हातात आलेल्या पिकाची अवस्था दाखवली, काहींनी कर्जाची चिंता व्यक्त केली, तर काहींनी आता पुढचा हंगाम कसा उभा करायचा? असा थेट प्रश्न उपस्थित केला. श्री. नार्वेकर यांनी प्रत्येकाचे म्हणणे संयमाने ऐकून घेतले. त्यांच्या वेदना केवळ निवेदनातील ओळी नसून त्या कुटुंबाच्या जगण्याशी निगडित आहेत, याची जाणीव ठेवून प्रशासनाने काम केले पाहिजे, असे त्यांनी अधिकाऱ्यांना सांगितले. दुष्काळ जाहीर होणे हा या प्रक्रियेचा शेवट नाही, तर मदत प्रत्यक्ष शेतकऱ्यापर्यंत पोहोचविण्याची खरी सुरुवात आहे. पंचनाम्यात प्रत्येक बाधित क्षेत्राचे आणि प्रत्येक शेतकऱ्याच्या नुकसानीचे वास्तव प्रतिबिंबित झाले पाहिजे. एकही पात्र शेतकरी केवळ तांत्रिक बाबींमुळे मदतीपासून वंचित राहू नये, अशा स्पष्ट सूचना त्यांनी महसूल आणि कृषी यंत्रणेला दिल्या. उत्तर महाराष्ट्रातील दौऱ्यात विविध भागांतील शेतात जाऊन कापूस, मका व इतर पिकांचे झालेले नुकसान आपण प्रत्यक्ष पाहिले असल्याचे सांगून श्री. नार्वेकर म्हणाले की, अनेक ठिकाणी परिस्थिती अत्यंत चिंताजनक आहे. शेतकऱ्याने बी-बियाणे, खते, औषधे, मजुरी यासाठी केलेला खर्च आणि त्यानंतर पावसाअभावी हातातून निसटलेले पीक यामुळे त्याच्यावर आर्थिक आणि मानसिक ताण निर्माण झाला आहे. अशा वेळी प्रशासनाने कागदी प्रक्रिया म्हणून नव्हे, तर संकटात सापडलेल्या कुटुंबाला आधार देण्याच्या भावनेतून पंचनामे करणे आवश्यक आहे. धुळे शहरालगतच्या काही भागांतील शेतकऱ्यांनी दुष्काळी लाभाच्या संदर्भातील अडचणी विधानसभा अध्यक्ष श्री. नार्वेकर यांच्या निदर्शनास आणून दिल्या. शहर परिसरातील पाच किलोमीटरच्या आतील काही बाधित शेतकऱ्यांची नावे लाभाच्या यादीत नसल्याची खंत त्यांनी व्यक्त केली. या प्रकरणाची सखोल माहिती प्रशासनाकडून मागवून लागू निकषांच्या आधारे पात्र शेतकऱ्यांना न्याय मिळवून देण्यासाठी आवश्यक पाठपुरावा केला जाईल, असे विधानसभा अध्यक्ष श्री. नार्वेकर यांनी स्पष्ट केले. शेताच्या बांधावर उभे राहून शेतकऱ्यांशी बोलताना ते म्हणाले, पिकाच्या प्रत्येक सुकलेल्या पानामागे शेतकऱ्याचा घाम आहे. हा घाम वाया जाऊ नये आणि संकटाच्या काळात त्याला आपण एकटे सोडणार नाही, हा विश्वास शासन आणि प्रशासनाने आपल्या कृतीतून निर्माण केला पाहिजे. त्यासाठी नुकसानीचे वस्तुनिष्ठ मूल्यांकन आणि मदतीची प्रभावी अंमलबजावणी अत्यंत महत्त्वाची आहे. दुष्काळी मदतीबाबत विविध स्तरांवरून होत असलेल्या मागण्यांच्या संदर्भात त्यांनी सांगितले की, सध्या पंचनामे व नुकसानीचे मूल्यांकन सुरू आहे. या प्रक्रियेनंतर वस्तुस्थिती अधिक स्पष्ट होईल. शेतकऱ्यांच्या हितासाठी आवश्यक त्या बाबी शासनापर्यंत ठामपणे मांडल्या जातील. नुकसानभरपाई, पीक कर्ज, वीज, पिण्याचे पाणी, चारा, रोजगार तसेच अन्य दुष्काळी सुविधांबाबत शेतकऱ्यांचे प्रश्न विधिमंडळाच्या व्यासपीठावरही प्रभावीपणे मांडले जातील.

शेतकरी संकटात असताना त्याच्या पाठीशी उभे राहणे ही केवळ प्रशासकीय जबाबदारी नसून ती शासन व्यवस्थेची संवेदनशील बांधिलकी आहे, असे श्री. नार्वेकर यांनी नमूद केले. शासनाने यापूर्वीही शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी विविध निर्णय घेतले असून, सध्याच्या दुष्काळी परिस्थितीतही शेतकरी हिताचे निर्णय प्राधान्याने घेण्यात येतील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. दुष्काळामुळे कोरड्या पडलेल्या मातीतून चालत, नुकसान झालेल्या पिकांची पाहणी करत आणि शेतकऱ्यांच्या व्यथा ऐकत दुष्काळ जाहीर झाला आहे; आता मदत केवळ शासन निर्णयात न राहता ती शेतकऱ्याच्या हातात, त्याच्या घरापर्यंत आणि त्याच्या उद्याच्या आशेपर्यंत पोहोचली पाहिजे. झालेल्या या दौऱ्यात विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांची ही थेट भावना यावेळी प्रकर्षाने समोर आल्याची भावना शेतकऱ्यांनी व्यक्त केली. यावेळी माजी आमदार कुणाल पाटील, तालुका कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती योगेश पाटील, उपसभापती संभाजी राजपूत, रायबा कुणाल पाटील, हर्षल साळुंखे, प्रभाकर भामरे, प्रांताधिकारी रोहन कुंवर, कृषी उपसंचालक प्रज्ञा पवार यांच्यासह विविध शासकीय यंत्रणांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

# श्री हिरा करंडक राज्यस्तरीय वादविवाद स्पर्धेत आर.सी. पटेल आय.एम.आर.डी., शिरपूरच्या विद्यार्थ्यांचा प्रथम क्रमांक

शिरपूर – हिरा प्रतिष्ठान, नंदुरबार आयोजित हिरा प्रेरणा महोत्सव २०२६ – पर्व १ अंतर्गत श्री काकासाहेब हिरालाल मगनलाल चौधरी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, नंदुरबार येथे आयोजित श्री हिरा करंडक राज्यस्तरीय वादविवाद स्पर्धेत आर. सी. पटेल एज्युकेशनल ट्रस्टच्या इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट रिसर्च अँड डेव्हलपमेंट , शिरपूर येथील तृतीय वर्ष बीबीएचे विद्यार्थी रोशनी मनोहर शिंदे व अभिषेक नरेंद्र मिश्रा यांनी उत्कृष्ट वक्तृत्व कौशल्याचे प्रदर्शन करत प्रथम क्रमांक पटकावला.

स्पर्धेचा विषय सोशल मीडिया : जेन झेड च्या अभिव्यक्तीचे व्यासपीठ की मानसिक गुलामगिरीचे साधन? असा होता. राज्यभरातील विविध महाविद्यालयांतील स्पर्धकांमध्ये झालेल्या या चुरशीच्या स्पर्धेत आय.एम.आर.डी. च्या विद्यार्थ्यांनी प्रभावी मांडणी करत परीक्षकांची मने जिंकली. या यशाबद्दल विद्यार्थ्यांना रुपये ५,१०० रोख पारितोषिक तसेच मानाचा फिरता करंडक जाहीर करण्यात आला असून पारितोषिक वितरण समारंभ दि. १५ सप्टेंबर २०२६ रोजी संपन्न झाला. या स्पर्धेसाठी विद्यार्थ्यांनी परिश्रमपूर्वक तयारी केली. त्यांना परिसंस्थेच्या प्राध्यापकांनी विषयाची सखोल माहिती, प्रभावी वक्तृत्व कौशल्य, सादरीकरण तंत्र आणि युक्तिवादाची मांडणी याबाबत मार्गदर्शन केले. तसेच संस्थेच्या संचालिका डॉ. वैशाली पाटील यांनी विद्यार्थ्यांना सातत्याने प्रोत्साहन व प्रेरणा देऊन स्पर्धेत उत्कृष्ट कामगिरी करण्यासाठी प्रोत्साहित केले. या उल्लेखनीय यशाबद्दल माजी मंत्री आमदार अमरिशभाई पटेल,आर. सी. पटेल एज्युकेशनल ट्रस्ट अध्यक्ष भूपेशभाई पटेल, उपाध्यक्ष चिंतनभाई पटेल, सचिव राजगोपाल भंडारी, सर्व ट्रस्टी, परिसंस्थेच्या संचालिका डॉ. वैशाली पाटील, एमसीए व आयएमसीए विभागप्रमुख डॉ. मनोज बेहेरे, आयक्यूएसी समन्वयक डॉ. मनोज पटेल, पदवी विभागप्रमुख डॉ. तुषार पटेल यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून त्यांच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. या स्पर्धेसाठी विद्यार्थ्यांना स्पर्धा समितीच्या समन्वयक डॉ. प्रियांका भंडारी, समिती सदस्य प्रा. विजय गर्गे, प्रा. ज्योती गोराणे, प्रा. ज्योत्सना माळी, प्रा. प्रियांका सैंदाणे, डॉ. रुपाली अग्रवाल, प्रा. सुवर्णा चौधरी, प्रा. केदार आपटे यांचे मोलाचे मार्गदर्शन व प्रोत्साहन लाभले.

# आर.सी.पटेल आय.एम.आर.डी. मध्ये बी.सी.ए. अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांसाठी इंडक्शन प्रोग्राम उत्साहात संपन्न

शिरपूर – आर. सी. पटेल इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट रिसर्च अँड डेव्हलपमेंट मध्ये शैक्षणिक वर्ष २०२६ – २७ मधील प्रथम वर्षाच्या विद्यार्थ्यांसाठी परिचय प्रेरणा सप्ताह दि. १५ सप्टेंबर ते १९ सप्टेंबर दरम्यान उत्साहात संपन्न झाला. या सप्ताहाच्या समारोपप्रसंगी परिसंस्थेच्या बी.सी.ए. अभ्यासक्रमाचे माजी विद्यार्थी देवेंद्र ठाकरे (सॉफ्टवेअर डेव्हलपमेंट स्पेशलिस्ट, एमडॉक्स, पुणे), रोहित बोरसे (क्लाऊड इंजिनिअर डेलॉईट, यू एस आय, पुणे), प्रथमेश जडे (सायबर सिक्युरिटी अनालिस्ट असेंचर, पुणे) यांना प्रमुख अतिथी म्हणून आमंत्रित करण्यात आले होते. सदर प्रसंगी मान्यवरांसमवेत व्यासपीठावर परिसंस्थेच्या संचालिका डॉ. वैशाली पाटील, सहाय्यक संचालक व एमसीए पदव्युत्तर विभाग प्रमुख डॉ. मनोज बेहेरे, आय.क्यू.ए.सी. कॉर्डिनेटर डॉ. मनोज पटेल, पदवी विभाग प्रमुख डॉ. तुषार पटेल उपस्थित होते. दीप प्रज्वलन व सरस्वती पूजनाने या सोहळ्याचे उद्घाटन करण्यात आले. प्रमुख अतिथींचा परिचय देण्यात आला आणि डॉ. डॉक्टर वैशाली पाटील यांच्या हस्ते स्मृतिचिन्ह पुष्पगुच्छ देऊन प्रमुख अतिथींना सन्मानित करण्यात आले. उद्घाटनानंतर प्रास्ताविकातून पदवी विभाग प्रमुख डॉ. तुषार पटेल यांनी या इंडक्शन प्रोग्रामचा उद्देश विषद करत विद्यार्थ्यांना आयएमआरडी बीसीएच्या विद्यार्थ्यांचे विविध क्षेत्रातील गाठलेले उच्च शिखर, शैक्षणिक क्षेत्रातील विद्यापीठाच्या गुणवत्ता यादीत विद्यार्थ्यांनी मिळवलेले स्थान, विद्यार्थ्यांना आयटी क्षेत्रातील नामांकित कंपन्यांमध्ये नोकरीची संधी या समवेत परिसंस्थेत विविध क्लब द्वारे सांस्कृतिक कला, क्रीडा, तांत्रिक अशा विविध प्रकारच्या स्पर्धा तसेच विद्यापीठ परिक्षेत्रात होणाऱ्या विविध स्पर्धांसाठी मुलांना केले जाणारे मार्गदर्शन उपलब्ध असलेल्या सुविधा याबद्दल माहिती देत नवीन प्रवेशित विद्यार्थ्यांनी देखील असेच उच्च ध्येय ठेवावेपुढील तीन वर्षांच्या शैक्षणिक प्रगती बाबत मार्गदर्शन केले. प्रास्ताविकानंतर शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मधील अभ्यासक्रमाचे प्रथम वर्ष व द्वितीय वर्षातील गुणवंत विद्यार्थी, स्मार्ट इंडिया हॅकथोन २०२६ विजेते, ग्रंथालय व एनएसएस विभागात द्वारे घेण्यात आलेल्या स्पर्धेतील विजेते, वाचन कक्षाचे बेस्ट लायब्ररी यूजर अवार्ड उत्तम वाचक व या इंडक्शन प्रोग्राम मध्ये विविध गुण सादर करणाऱ्या विद्यार्थ्यांचा स्मृतिचिन्ह व प्रमाणपत्र देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी या प्रवेश परिचय सप्ताहाच्या विविध दिवशी घेण्यात आलेल्या उपक्रमां बद्दल १० विद्यार्थ्यांनी मनोगत व्यक्त केले. मान्यवरांच्या मार्गदर्शन सत्रामध्ये रोहित बोरसे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना सांगितले की, पदवी अभ्यासक्रमाच्या प्रथम वर्षात स्वतःतील गुण ओळखून, आपल्याला आवश्यक असणाऱ्या वेगवेगळ्या विषयांची पायाभरणी करावी. दुसऱ्या आणि तिसऱ्या वर्षामध्ये नवनवीन तंत्रज्ञान शिकून स्वतःचा मुख्य विषय निवडावा व त्याद्वारे आपण योग्य कुठल्या क्षेत्रात काम करू शकतो, हे ठरवून पुढील तयारी करावी. मार्गदर्शनाच्या दुसऱ्या सत्रात श्री. प्रथमेश जडे यांनी स्वतःला अद्यावत करून वेळोवेळी शिकत स्वतःचा विकास साधावा, तर श्री. देवेंद्र ठाकरे यांनी आपण शिक्षण का घेत आहोत, आपणास काय करावयाचे आहे? हे सुनिश्चित करून मिळालेला ज्ञानाचा योग्य तो उपयोग आपल्याला करता आला पाहिजे. आजच्या परिस्थितीला अनुसरून आपण स्वतःला इंटरव्यू तंत्र, कृत्रिम बुद्धिमत्तेद्वारा घेतले जाणारे राऊंड, तांत्रिक दृष्टीने सक्षम करणे महत्त्वाचे आहे.

प्रमुख अतिथी म्हणून निमंत्रित केलेल्या तिन्ही माजी विद्यार्थ्यांनी मनोगतातून कृतज्ञता व्यक्त करतांना सांगितले कि, शिरपूर तालुक्यासारख्या ग्रामीण भागातून व अतिशय सामान्य परिस्थितीतून आज यशाच्या उच्च शिखरापर्यंत पोहोचण्यामध्ये महत्त्वाचे स्थान आहे. त्यांच्या यशस्वी करिअरमध्ये आय एम आर डी द्वारा त्यांना मिळालेले मार्गदर्शन, त्यांच्यासाठी घेण्यात आलेले परिश्रम आदी गोष्टींचा सिंहाचा वाटा आहे असे सांगितले. ज्या गोष्टी मोठ्या शहरात उपलब्ध नाही अशा सर्व सुविधा, तांत्रिक सहाय्य, मार्गदर्शन हे आय एम आर डी मध्ये उपलब्ध आहे.

# जागतिक रेबीज दिनानिमित्त धुळ्यात मोफत रेबीज लसीकरण शिबिर

धुळे – जागतिक रेबीज दिनानिमित्त जिल्हा पशुवैद्यकीय सर्वचिकित्सालय, धुळे येथे पशुसंवर्धन विभाग व धुळे महानगरपालिका यांच्या संयुक्त विद्यमाने मोफत रेबीज लसीकरण शिबिराचे आयोजन करण्यात आले. शिबिरामध्ये पाळीव कुत्र्यांना रेबीज प्रतिबंधक लसीकरण करण्यात आले. तसेच पशुपालक व नागरिकांना रेबीज आजाराची कारणे, प्रसाराचे मार्ग, प्रतिबंधात्मक उपाय, कुत्र्यांचे नियमित लसीकरण तसेच कुत्रा चावल्यानंतर घ्यावयाची तातडीची काळजी याबाबत मार्गदर्शन करण्यात आले. या शिबिरास मा. डॉ. गिरीश पाटील, जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त, धुळे, डॉ. संतोष बडे, सहायक आयुक्त पशुसंवर्धन, डॉ. नितीन सोनवणे, सहायक आयुक्त पशुसंवर्धन, डॉ. मनोज पाटील, सहायक आयुक्त पशुसंवर्धन, डॉ. प्रशांत निकम पशुवैद्यकीय अधिकारी, डॉ. रवींद्र गाडे, पशुवैद्यकीय अधिकारी तसेच धुळे महानगरपालिकेचे श्री. चंद्रकांत जाधव, स्वच्छता निरीक्षक यांनी उपस्थिती दर्शविली. यावेळी उपस्थित अधिकाऱ्यांनी नागरिकांना रेबीज हा प्राणघातक परंतु प्रतिबंध करता येण्याजोगा आजार असल्याने पाळीव कुत्र्यांचे नियमित रेबीज लसीकरण करणे आणि कुत्रा चावल्यानंतर जखम तात्काळ साबण व पाण्याने स्वच्छ धुऊन वैद्यकीय सल्ला घेणे आवश्यक असल्याचे आवाहन केले. शिबिराच्या आयोजनासाठी पशुसंवर्धन विभागातील अधिकारी व कर्मचारी तसेच धुळे महानगरपालिकेच्याअधिकारी व संबंधित कर्मचाऱ्यांनी सहकार्य केले.

# आ. अमरिशभाई पटेल यांच्या ७५ व्या वाढदिवसानिमित्त अस्तित्व फाउंडेशन तर्फे १०० निर्माल्य संकलन पात्रांचे वाटप

शिरपूर – माजी मंत्री आमदार अमरिशभाई पटेल यांच्या ७५ व्या वाढदिवसानिमित्त आयोजित अमृत महोत्सव अंतर्गत अस्तित्व सोशल वेल्फेअर फाऊंडेशनच्या वतीने शिरपूर शहरात विविध समाजोपयोगी उपक्रम राबविण्यात येत आहेत. याच उपक्रमाचा एक भाग म्हणून शहरातील विविध मंदिरांसाठी १०० निर्माल्य संकलन पात्रांचे वाटप श्री बालाजी मंदिर, खालचे गाव शिरपूर येथे करण्यात आले. या उपक्रमातून मंदिर परिसर स्वच्छ ठेवण्याबरोबरच निर्माल्याचे योग्य संकलन व पर्यावरणपूरक व्यवस्थापन करण्याचा संदेश देण्यात आला. या प्रसंगी माजी नगराध्यक्षा सौ. जयश्रीबेन पटेल, माजी नगराध्यक्ष भूपेशभाई पटेल, अस्तित्व सोशल वेल्फेअर फाऊंडेशनच्या संचालिका सौ. कृतीबेन पटेल, के. डी. पाटील, सुभाष कुलकर्णी, अस्तित्व फाऊंडेशनच्या समन्वयिका सौ. सोनिया भसीन, सतिषदास भोंगे महाराज, स्वीय सहाय्यक सुनील जैन, योगेश्वर माळी यांच्यासह शहरातील विविध मंदिरांचे पुजारी, भाविक, नागरिक आणि अस्तित्व फाऊंडेशनचे सदस्य उपस्थित होते.

आपल्या भारतीय संस्कृतीत देवाला अर्पण करण्यात येणाऱ्या फुलांना, हारांना, पानांना तसेच इतर पूजासाहित्याला श्रद्धेचे आणि भावनेचे विशेष स्थान आहे. मात्र पूजा झाल्यानंतर हे निर्माल्य अनेकदा नदी, नाले, तलाव किंवा सार्वजनिक ठिकाणी टाकले जाते. त्यामुळे जलप्रदूषण, दुर्गंधी तसेच सार्वजनिक स्वच्छतेच्या समस्या निर्माण होण्याची शक्यता असते. ही बाब लक्षात घेऊन निर्माल्य स्वतंत्रपणे संकलित करून त्याची योग्य पद्धतीने विल्हेवाट लावण्यासाठी अस्तित्व फाऊंडेशनने हा उपक्रम हाती घेतला. देवाला अर्पण केलेली श्रद्धा, निसर्गाला देऊया स्वच्छतेची भेट! या संकल्पनेतून राबविण्यात आलेल्या या उपक्रमाचा मुख्य उद्देश नागरिकांना निर्माल्याचे स्वतंत्र संकलन करण्याची सवय लावणे, मंदिर परिसर स्वच्छ ठेवणे, पर्यावरणाचे संवर्धन करणे आणि स्वच्छतेबाबत जनजागृती निर्माण करणे हा आहे. शहरातील विविध मंदिरांमध्ये निर्माल्य संकलनासाठी स्वतंत्र पात्र उपलब्ध करून देण्यात आल्यामुळे भाविकांना पूजेनंतरचे फुले, हार, पाने व इतर निर्माल्य योग्य ठिकाणी जमा करण्याची सुविधा मिळणार आहे. यामुळे मंदिर परिसरात स्वच्छता राखण्यास मदत होणार असून, निर्माल्य सार्वजनिक ठिकाणी किंवा जलस्रोतांमध्ये टाकले जाण्याचे प्रमाण कमी करण्यासाठीही या उपक्रमाला हातभार लागणार आहे. निर्माल्य संकलनाची व्यवस्था ही केवळ स्वच्छतेपुरती मर्यादित न राहता नागरिकांमध्ये पर्यावरणपूरक धार्मिक आचरणाची जाणीव निर्माण करण्याच्या दृष्टीनेही महत्त्वपूर्ण ठरणार आहे. श्रद्धा आणि पर्यावरण संवर्धन यांचा समतोल साधत धार्मिक स्थळांभोवती स्वच्छ आणि सुंदर वातावरण निर्माण करण्याचा प्रयत्न या उपक्रमातून करण्यात आला आहे.

# धुळे शहरातील चक्करबर्डी येथे 'भटके विमुक्त हक्क व प्रमाणपत्र अभियान' शिबिराचे भव्य व यशस्वी आयोजन: ५०० हून अधिक नागरिकांचा सहभाग




धुळे– विमुक्त जाती व भटक्या जमाती (विजाभज) संवर्गातील नागरिकांचे सर्वसाधारण रहिवास ठिकाण निश्चित नसल्याने त्यांना विविध ओळखपत्रे व शासकीय योजनांचे लाभ मिळण्यात येणाऱ्या अडचणी दूर करण्यासाठी, शासन निर्णयानुसार धुळे जिल्ह्यात विशेष अभियानाचे आयोजन करण्यात आले आहे. 'राष्ट्रनेता ते राष्ट्रपिता' अभियानांतर्गत दिनांक २८ व २९ सप्टेंबर २०२६ रोजी मौजे धुळे शहर येथील चक्करबर्डी परिसर येथे विशेष भव्य शासकीय योजना व प्रमाणपत्र शिबिर अभियान यशस्वीपणे संपन्न झाले. या दोन दिवसीय विशेष मोहीम शिबिरामध्ये सुमारे ५०० नागरिकांनी उत्साहाने सहभाग नोंदवून शासनाच्या विविध विभागांच्या दाखल्यांसाठी आणि प्रमाणपत्रांसाठी आपले अर्ज दाखल केले आहेत.‌विविध शासकीय विभागांचे स्टॉल व सेवा:‌नागरिकांना एकाच ठिकाणी सर्व आवश्यक सेवा मिळाव्यात यासाठी शिबिरामध्ये महसूल विभाग, महिला व बाल कल्याण विभाग, महानगरपालिकेचा आरोग्य विभाग, आधार नोंदणी केंद्र, पुरवठा विभाग आणि जन्म–मृत्यू दाखला विभाग यांसह इतर सर्व महत्त्वाच्या विभागांचे स्टॉल लावण्यात आले होते. या माध्यमातून आधारकार्ड, शिधापत्रिका, जात प्रमाणपत्र, आयुष्यमान भारत कार्ड, उत्पन्नाचा दाखला, रहिवास व अधिवास प्रमाणपत्र अशा विविध मूलभूत दाखल्यांची प्रक्रिया पार पाडण्यात आली.‌प्रमुख अधिकारी व मान्यवरांची उपस्थिती:‌या अभियानास सदस्य सचिव तथा सहाय्यक संचालक (इतर मागास बहुजन कल्याण, धुळे) सुभाष फड, डॉ. महेश मोरे, नायब तहसीलदार अविनाश सोनकांबळे, मंडळाधिकारी अर्चना पोळ, धुळे शहर तलाठी किशोर बडगुजर, ग्राम महसूल अधिकारी प्रमोद बडगुजर आणि प्रसाद रणदिवे आदी वरिष्ठ शासकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांची प्रमुख उपस्थिती होती. या शिबिराचे नियोजन व ते यशस्वी करण्यासाठी शिवसेना ओबीसी बारा बलुतेदार विभागाचे सोशल मीडिया राज्यप्रमुख संजय कुसळकर, अरुण लष्कर, अंबादास लष्कर आणि किशोर पाटील यांनी विशेष परिश्रम घेतले. पुढील नियोजन: प्रत्येक तिमाहीच्या पहिल्या मंगळवारी होणार 'मेळावे'‌शासन परिपत्रकानुसार, धुळे जिल्ह्यातील सर्व तहसीलदारांना महसूल विभाग व इतर मागास बहुजन कल्याण विभागाच्या संयुक्त विद्यमाने मंडळ व तालुका स्तरावर अशा शिबिरांचे नियोजन करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. जिल्हास्तरीय समितीवरील चार अशासकीय सदस्य आणि तालुकास्तरावरील दोन अशासकीय सदस्यांच्या मदतीने व सल्ल्याने हे आयोजन केले जात आहे. २८ आणि २९ सप्टेंबरच्या या विशेष वस्तीनिहाय अभियानानंतर, आता पुढील नियमित अभियान दिनांक ०६ ऑक्टेबर २०२६ पासून प्रत्येक तिमाहीच्या पहिल्या मंगळवारी भटके विमुक्त समूह दाखला मेळावे म्हणून अनिवार्यपणे आयोजित केले जाणार आहेत.

हे मराठी साप्ताहिक, प्रकाशक संजय अण्णा कुसळकर यांनी मुद्रक अब्दुल मलिक मोहम्मद शरीफ अन्सारी यांच्या न्यू शार्प ऑफसेट प्रिंटर्स, अप्सरा हॉटेल, नवीन बस स्टॅण्ड समोर, मालेगांव, जि. नाशिक येथे छापून सा. 'प्रजा न्याय' कार्यालय – घर नं. २६, चक्करबर्डी, शासकीय दूध डेअरी रोड, पाण्याच्या टाकीजवळ, धुळे – ४२४ ००१ येथून प्रकाशित केले आहे. संपादक, मालक, संजय अण्णा कुसळकर – भ्रमणध्वनी – ९४२२७९८०९३ / ९०२८१३६९५३. Email - kusalkars@gmail.com / prajanyay@gmail.com (कायदेशीर सल्लागार – ॲड. उमेश विठ्ठल सुर्यवंशी)
(या वृत्तपत्रातील लिखानाशी मालक/प्रकाशक/संपादक सहमत असतीलच असे नाही.) (कोणताही वाद धुळे न्यायालयांतर्गत)